# नजर आणि स्वभाव

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. १६–१२–२००८
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

नजर आणि स्वभाव याचा विचार करता सद्य परिस्थिती दृष्टीआड करता येणं शक्य नाही. आजही मुंबईकरांच्या मनावरच्या अतिरेकी हल्ल्याच्या जखमा ओल्या आहेत. त्या कधी भरून येतील कुणास ठाऊक. दक्षिण मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यातील दहाही अतिरेकी पंचविशीच्या आतले होते.सगळे सुशिक्षित होते. ज्यावेळी हे तरूण अतिरेक्यांच्या संघटनेच्या संपर्कात आले, त्यावेळी संघटनेने त्यांच्या कुटुंबीयांच्या पालन पोषणाची जबाबदारी घेतली. द्रव्याचे आमिष दाखवून त्यांनी त्या तरूणांच्या मनावर भारताविषयी द्वेष बिंबवला. जिहादच्या नावाखाली त्यांनी धर्मद्वेष भडकवला. परिणामी त्या तरूणांची नजर पूर्णत: बदलली. त्यांचा स्वभाव  निर्दयी आणि क्रूर  बनला. त्यांनी रायफल्सच्या बेछूट फैरी झाडल्या आणि  निरपराधांचे बळी घेतले. कोणत्याही क्षणी मृत्यू आपल्यावर झडप घालेल हे ठाऊक असतानाही अतिरेक्यांनी आगीत उडी घेतली. त्यातले नऊ जण मारले गेले. विकृत मार्गदर्शनामुळे नजर  कोणत्या स्तरापर्यंत विकृत होऊ शकते आणि स्वभाव किती क्रूर होऊ शकतो याचं हे एक ज्वलंत उदाहरण आहे.  लादेनचंच उदाहरण घ्याना. हा उच्चशिक्षित, इकॉनॉमिस्ट .कुशाग्र बुद्धीचा. अमेरिकेविषयी त्याच्या मनात तीव्र द्वेष जसा वाढत गेला, तशी त्याची नजर बदलत गेली. आणि तो क्रूर अतिरेकी बनला. त्याने उच्चशिक्षित तरूणांना विमान चालवण्याचं प्रशिक्षण  अमेरिकेत घ्यायला लावलं. जिहादमुळे त्या तरूणांची नजरच  बदलली.  त्यांनी अमरिकेतील ट्विन टॉवर्सवर विमानं धडकवून आत्महत्या केली. काही क्षणातच त्या इमारतींच्या ढिगाऱ्याखाली हजारो निरपराध गाडले गेले. अशा अनेक घटना अतिरेकी जगभरात घडवत आहेत. हे अतिरेकी अतिरेक्यांच्या कुळात जन्माला आलेले नाहीत. कारण असं कूळच नसतं. कोणतंही बालक जन्माला येताना दुष्ट प्रवृत्तीचं नसतं.  विकृत नजर विपरीत स्वभाव घडवत असते. परिणामी विघातक कृत्यं घडतात. पण मुळातच नजर विकृत न होता सुयोग्य घडवली गेली तर अर्थातच स्वभावही आनंदी आणि समाधानी बनेल आणि अशा स्वभावामुळेच विधायक कार्यं उभी राहू शकतील. अशी सुयोग्य नजर घडवली जाते ‘अध्यात्म–विज्ञाना’च्या मुशीत.